# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. १७.०४.२०२१

वाचाः-
१) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना/२०२०/ प्र.क्र.५८ /आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.
४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग,मुंबई यांचे आदेश क्रं.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि.०४.०४.२०२१, दि.०५.०४.२०२१ व दि.१३.०४.२०२१.
५) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दिनांक दि.०५.०४.२०२१, दि.०६.०४.२०२१ व दि.१४.०४.२०२१

**विषयः** कोरोना विषाणूंचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी (Break the Chain) प्रतिबंधात्मक आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी या कार्यालयाचे आदेश दिनांक १४.०४.२०२१ अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायायोजना म्हणून नांदेड जिल्ह्यात दिनांक १४.०४.२०२१ पासून अत्यावश्यक सेवेत ज्या बाबींचा समावेश केला आहे. सदर आस्थापनांवर मोठया प्रमाणात नागरीकांची होणारी गर्दी व जिल्ह्यात कोरोना बाधीत रूग्ण संख्येत होणारी वाढ पाहता जिल्ह्यात कोरोना संसर्ग प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून किराणा सामान दुकाने, भाजीपाला दुकाने, भाजीबाजार, फळविक्रेते, बेकरी, मिठाई, खाद्य दुकाने आणि सर्व प्रकारची खाद्य दुकाने या आस्थापनावर निर्बंध घालणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी **डॉ.विपीन इटनकर**(भा.प्र.से.), **जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या अधिन राहून मला प्राप्त झालेल्या अधिकारातून कोरोना विषाणु संसर्ग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत **किराणा सामान दुकाने, भाजीपाला दुकाने, भाजीबाजार, फळविक्रेते, बेकरी, मिठाई, खाद्य दुकाने आणि सर्व प्रकारची खाद्य दुकाने** या आस्थापना दि.१९.०४.२०२१ (सोमवार) पासून सकाळी ८.०० ते दुपारी १.०० या वेळेत चालू राहतील यानंतरच्या वेळेत घरपोच सेवा (होम डिलेव्हरी) साठी मुभा असेल.

सदर आदेशाची अमंलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड, पोलीस अधिक्षक नांदेड, आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालीका नांदेड, मुख्याधिकारी, सर्व नगर परीषद / नगर पंचायत यांचे वर रहील.

सदर आदशाचे उल्लघंन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ तसेच भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ प्रमाणे दंडनिय कारवाहीस पात्र राहील.

**सदरचा आदेशांची अंमलबजावणी दिनांक १९ एप्रिल, २०२१ पासून ते दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यत लागू राहील.**

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड जिल्हा

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड

**प्रतिलिपीः माहितीस्वत सादर.**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग(विशेष) मंत्रालय मुंबई-३२
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**प्रत – माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,नांदेड परिक्षेत्र नांदेड.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
४. पोलीस अधीक्षक, नांदेड.
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, जिल्हा नांदेड.
६. सर्व तहसीलदार जिल्हा नांदेड
७. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड.
८. अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महा.विष्णूपूरी नांदेड
९. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
११. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत जिल्हा नांदेड
१२. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, नांदेड.
१३. जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड.
१४. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नांदेड.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.